महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६ १२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महत्वाचे /तात्काळ**

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-५/एडीएम/सुरक्षा ठेव रक्कम/२०२२/ 5909
दिनांक : 19 DEC 2022

**स्मरणपत्र**

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानीत/
खाजगी विनाअनुदानित संस्था

**विषय : - तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शैक्षणिक संस्थांकडे विद्यार्थ्यांनी जमा केलेली अनामत रक्कम परत करणेबाबत**

संदर्भ : - १) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण — २०२२/प्र.क्र.१४२/२२/तांशि-३, दिनांक १०.११.२०२२.
२) संचालनालयाचे पत्र क्रमांक २ अ/एडीएम/२०२२/१८२, दिनांक २६.०५.२०२२.
३) तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०२२/३७९ दिनांक १६.११.२०२२.
४) तंशिविकापु/विवि-५/एडीएम/सुरक्षा ठेव रक्कम/२०२२/५४४७ दिनांक २२.११.२०२२.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त निर्देशानुसार या विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय, अशासकीय अनुदानीत, खाजगी विनाअनुदानित संस्थांच्या प्रमूखांना कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण विभागातील महाविद्यालयांमध्ये सुमारे १२ कोटी रुपये अनामत रक्कम पडून असल्याचे निवेदन कॉप्स विद्यार्थी संघटनेने दिनांक २२.०४.२०२२ रोजी दिले होते. त्याअनुषंगाने संचालनायांतर्गत येणाऱ्या विभागातील संस्थांमध्ये अनामत रक्कम शिल्लक असल्याबाबत तपासणी करुन त्याचा अहवाल सादर करण्यास संचालनालयाने संदर्भाधीन दि.२६.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. त्यानुसार सर्व विभागीय कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेत असलेल्या व शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना परत न केलेली सद्यस्थितीतील अनामत रक्कम रुपये ११.७१ कोटी इतकी असल्याचे आढळून आले.

या माहितीच्या अनुषंगाने शासनाशी पत्रव्यवहार झाल्यानंतर शासनाने संस्थांकडील विद्यार्थ्यांच्या अनामत रक्कम परत करण्याबाबत संदर्भाधीन दि. १०.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

**" जे विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करुन बाहेर पडले आहेत, मात्र त्यांची अनामत रक्कम त्यांना परत करण्यात आलेली नाही अशा विद्यार्थ्यांचा संपूर्ण तपशिल संबंधित संस्थांकडे उपलब्ध असणे अपेक्षित आहे. याबाबत संस्थांनी कालबध्द कार्यक्रमाची आखणी करुन, ज्या विद्यार्थ्यांची अनामत रक्कम नियमानुसार परत करणे अपेक्षित होते, परंतु ही रक्कम त्यांना परत करण्यात आलेली नाही अशा विद्यार्थ्यांशी किंवा त्यांच्या पालकांशी संबंधित संस्थेचे प्राचार्यांनी संपर्क साधून अनामत रक्कम धनादेशाद्वारे संबंधित विद्यार्थ्यास अदा करण्याची कार्यवाही करावी.**

कृ.मा.प.

**तसेच सद्यस्थितीत सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी संस्थेकडे अनामत रक्कम जमा केलेली आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून जे विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करुन बाहेर पडतील, त्यावेळी विद्यार्थ्याने अनामत रक्कम परत मिळणेबाबत मागणी केली असेल किंवा नसेल, तरीही संबंधित संस्थांनी सदर अनामत रक्कम नियमानुसार विद्यार्थ्यांना परत करावी"** तसेच सदर निर्णयाची सर्व संस्थांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी व याबाबतची जबाबदारी संचालक व सहसंचालक यांची संयुक्तपणे असेल असेही आदेश शासनाने संदर्भाधीन पत्रान्वये दिलेले आहेत.

शासनाचे आदेश विचारात घेता या विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत असलेल्या सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांनी त्यांचेकडे जमा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अनामत रक्कमेचा परतावा संबंधित विद्यार्थ्यास करण्याबाबत कालबध्द कार्यक्रम राबविण्याबाबत सर्व संस्थाप्रमूखांना या परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येत आहे. सर्व संस्थाप्रमूखांनी विद्यार्थ्यांना अनामत रक्कम धनादेशाद्वारे परत करण्याची अंम्लबजावणी **दिनांक ०९.१२.२०२२ रोजीपर्यंत करण्यात यावी,** व ती होत असल्याबाबत स्वतः संस्थाप्रमूखांनी खातरजमा करावी. तसेच या विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व संस्थाप्रमूखांनी विद्यार्थ्यांना अनामत रक्कम परत करण्यात येत असल्याच्या **कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास दिनांक १२.१२.२०२२ रोजीपर्यंत सादर करण्याबाबत संदर्भ क्र.०४ च्या परिपत्रकान्वे कळविण्यात आलेले होते, परंतु अद्यापपर्यंत अल्पशा संस्थांनी माहिती सादर केलेली आहे. त्यामुळे पुनःश्च एकदा या स्मरणपत्राद्वारे कळविण्यात की,** https://forms.gle/r3ccPF2zeAfkVuZG9 **या गुगलफार्मद्वारे दिनांक १९.१२.२०२२ रोजीपर्यंत न-चुकता कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात यावा. सदर कार्यवाही पूर्ण करणे बंधनकारक आहे. ज्या संस्था ही कार्यवाही पूर्ण करणार नाहीत त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. (बोर्डास/विद्यापीठास आवश्यक ती कार्यवाही करण्यास कळविले जाईल.)**

सोबत : संदर्भीय पत्रांच्या छायांकित प्रती.

(मा.रा.जाधव)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४४७
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
16 NOV 2022
आवक क्र......10520.......

**<u>महत्वाचे</u>**

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२२/३७९ दिनांक : 16 NOV 2022

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर

**विषय : तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शैक्षणिक संस्थांकडे विद्यार्थ्यांनी जमा केलेली अनामत रक्कम परत करणेबाबत...**

संदर्भ : १) शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१४२/२२/ तांशि-३, दिनांक १०.११.२०२२
२) संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०२२/१८२, दिनांक २६.५.२०२२

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण विभागातील महाविद्यालयांमध्ये सुमारे १२ कोटी रुपये अनामत रक्कम पडून असल्याचे निवेदन कॉप्स विद्यार्थी संघटनेने दिनांक २२.४.२०२२ रोजी दिले होते. त्याअनुषंगाने आपल्या विभागातील संस्थांमध्ये अनामत रक्कम शिल्लक असल्याबाबत तपासणी करुन त्याचा अहवाल सादर करण्यास संचालनालयाने संदर्भाधीन दि.२६.५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. त्यानुसार सर्व विभागीय कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेत असलेल्या व शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना परत न केलेली सदय:स्थितीतील अनामत रक्कम रुपये ११.७१ कोटी इतकी असल्याचे आढळून आले.

या माहितीच्या अनुषंगाने शासनाशी पत्रव्यवहार झाल्यानंतर शासनाने संस्थांकडील विद्यार्थ्यांच्या अनामत रक्कम परत करण्याबाबत संदर्भाधीन दि.१०.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

**" जे विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करुन बाहेर पडले आहेत, मात्र त्यांची अनामत रक्कम त्यांना परत करण्यात आलेली नाही अशा विद्यार्थ्यांचा संपूर्ण तपशिल संबंधित संस्थांकडे उपलब्ध असणे अपेक्षित आहे. याबाबत संस्थांनी कालबध्द कार्यक्रमाची आखणी करुन , ज्या विद्यार्थ्यांची अनामत रक्कम नियमानुसार परत करणे अपेक्षित होते, परंतु ही रक्कम त्यांना परत करण्यात आलेली नाही अशा विद्यार्थ्यांशी किंवा**

त्यांच्या पालकांशी संबंधित संस्थेचे प्राचार्यांनी संपर्क साधून अनामत रक्कम धनादेशाद्वारे संबंधित विद्यार्थ्यास अदा करण्याची कार्यवाही करावी.

**तसेच सदय:स्थितीत सर्व शैक्षणिक संस्थांमधे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी संस्थेकडे अनामत रक्कम जमा केलेली आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून जे विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करुन बाहेर पडतील, त्यावेळी विद्यार्थ्याने अनामत रक्कम परत मिळणेबाबत मागणी केली असेल किंवा नसेल, परंतु संबंधित संथांनी सदर अनामत रक्कम नियमानुसार विद्यार्थ्यांना परत करावी** " तसेच सदर निर्णयाची सर्व संस्थांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी व याबाबतची जबाबदारी संचालक व सर्व सहसंचालक यांची संयुक्तपणे असेल असेही आदेश शासनाने संदर्भाधीन पत्रान्वये दिलेले आहेत.

शासनाचे आदेश विचारात घेता आपल्या विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना त्यांचेकडे जमा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अनामत रक्कमेचा परतावा संबंधित विद्यार्थ्यास करण्याबाबत कालबध्द कार्यक्रम राबविण्याबाबत कळविण्यात यावे. संस्थांकडून विद्यार्थ्यांना अनामत रक्कम धनादेशाद्वारे परत करण्याची अंमलबजावणी होत असल्याबाबत स्वत: खातरजमा करावी. तसेच संस्थांकडून विद्यार्थ्यांना अनामत रक्कम परत करण्यात येत असल्याच्या कार्यवाहीचा विभागीय कार्यालयांनी कालबध्द आढावा घेऊन त्याची माहिती संचालनालयास १ महिन्यात सादर करावी.

**( डॉ.अभय वाघ )**
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई ४०००३२ यांना माहितीस्तव सादर

E:\Budage\2022-23\General Correspondence\Caution money refundable deposit COPS demand.docx

पत्र प्राप्त झाले
10 NOV 2022
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई-१.

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४४१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
Email ID: tashi3-hted@mah.gov.in
दूरध्वनी क्र.२२०४०९३५

क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१४२/२२/तांशि-३ दि.१० नोव्हेंबर, २०२२.

शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई
आवक क्र. ५११ ३०४५
दिनांक ११.११.२२
कार्यासन क्र. २३१

प्रति,
१ संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१.

विषय:- तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील सर्व शैक्षणिक संस्थाकडे विद्यार्थ्यांनी जमा केलेली अनामत रक्कम परत करणेबाबत...

संदर्भ:- आपले पत्र क्र.२अ/एडीएम/२०२२/३१७, दि.२० सप्टेंबर, २०२२.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील सर्व शैक्षणिक संस्थामध्ये शिक्षण घेत असलेल्या व शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना परत न केलेली सद्य:स्थितीतील अनामत रक्कम रु.११.७१ कोटी इतकी असुन ती संस्थाकडे जमा आहे.

त्यापैकी जे विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करुन बाहेर पडले आहेत, मात्र त्यांची अनामत रक्कम त्यांना परत करण्यात आलेली नाही, अश्या विद्यार्थ्यांचा संपूर्ण तपशिल संबंधित संस्थांकडे उपलब्ध असणे अपेक्षित आहे. याबाबत संस्थांनी कालबध्द कार्यक्रमाची आखणी करुन, ज्या विद्यार्थ्यांची अनामत रक्कम नियमानुसार परत करणे अपेक्षित होते, परंतु ही रक्कम त्यांना करण्यात आलेली नाही, अश्या विद्यार्थ्यांशी किंवा त्यांच्या पालकांशी संबंधित संस्थेचे प्राचार्य यांनी संपर्क साधुन अनामत रक्कम धनादेशाव्दारे संबंधित विद्यार्थ्यांस अदा करण्याची कार्यवाही करावी.

तसेच सद्य:स्थितीत सर्व शैक्षणिक संस्थामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी संस्थेकडे अनामत रक्कम जमा केलेली आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून जे विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करुन बाहेर पडतील, त्यावेळी विद्यार्थ्याने अनामत रक्कम परत मिळणेबाबत मागणी केली असेल किंवा नसेल, परंतु संबंधित संस्थांनी सदर अनामत रक्कम नियमानुसार विद्यार्थ्यांना परत करावी.

सदर निर्णयाची सर्व संस्थांनी काटेकोरपणे अंमजलबजावणी करावी व याबाबतची जबाबदारी संचालक, तंत्रशिक्षण व सर्व सहसंचालक यांची संयुक्तपणे असेल.

सामंत
१०-११-२०२२
(मनाली सामंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

निवड नस्ती/तांशि-३.